## -: प्रेसनोट  दिनांक :- १६/०३/२०१९

# कोंढवा पोलीसांनी कचरा गोळा करणा-या कुटूंबियाच्या मिसींग अल्पवयीन मुलीचा शोध घेऊन नातेवाईकाच्या सुखरुप ताब्यात दिले

दिनांक १४/०४/२०१९ रोजी रात्रौ महिला,रा.कोंढवा बुद्रूक, पुणे यांनी त्यांचेकडे रहात असलेली त्यांचे बहीणीची मुलगी वय ९ वर्षे ही मिसिंग झाले बाबत तक्रार देण्यासाठी पोलीस स्टेशनला आल्या सदर बाबत पोलीस स्टेशन येथे तात्काळ गुन्हा दाखल झाला. सदर बाबत अधिक माहीती घेतली असता सदरच्या फिर्यादी हया मुळ बीड च्या रहीवाशी असून त्या पुणे महानगर पालिका अंतर्गत स्वच्छ सेवा सहकारी संस्थेच्या माध्यमातून कचरा गोळा करण्याचे काम करतात दिनांक १४/४/२०१९ रोजी नेहमीप्रमाणे एका सोसायसटीमध्ये फिर्यादी या कचरा गोळा करीत असताना त्यांचेकडे रहात असलेली त्यांची बहीण ची अल्पवयीन मुलगी ही त्यांची नजर चूकवून सोसायटीच्या बाहेर येऊन मिसींग झाली होती. म्हणून गुन्हा दाखल होता.

दाखल गुन्हयाचा तपास सुरु असताना फिर्यादी यांचेकडे मिसींग झालेल्या अल्वयीन मुलीचा कोणताही फोटो उपलब्ध नव्हता त्यामुळे अल्पवयीन मुलीचा घेत असताना अडचण निर्माण झाली होती. तसेच फिर्यादी व त्यांचे कुटूंबिय हे निरक्षर असल्याने ते मोबाईल फोनही वापरत नसल्याने फक्त अल्पवयीन मुलीच्या वर्णना वरुन गुन्हयाचा अधिक तपास असे समजले की, फिर्यादी यांचे प्रमाणे इतर बायकाही कोंढवा भागात कचरा वेचतात व दिवसभर कचरा वेचल्यानंतर जमा झालेला कचरा टाकाऊ वस्तू विकण्यासाठी जात असतात

त्यामुळे  आज रोजी सकाळी भंगाराच्या दुकानावर जाऊन पोलीसांनी कचरा वेचणा-या महिलांकडे तपास केला असता त्यांचेकडून समजले की, दिनांक १४/४/२०१४ रोजी  नेहमीप्रमाणे त्या महीला कचरा गोळा करीत असताना त्यांचे पाठीमागे एक लहान मुलगी आलेली होती तिच्याकडे त्यांनी चौकशी केली असता तिने सांगीतले सदर मुलगी ही चूकून त्यांचे पाठीमागे आल्याने व खूप घाबरलेली होती.व तिला तिचा पत्ताही सांगता येत नव्हता तसेच तिला कोणतीही माहीती सांगता येत नव्हती म्हणून त्यांनी अल्पवयीन मुलीचा रात्रभर सांभाळ करुन सदरची मुलगी ही कचरा गोळा करणारे किंवा भंगार गोळा करणारे पैकी कोणाची तरी असावी म्हणून तिला भंगाराच्या दुकानावर तिला घेऊन आल्या होत्या  तरी सदर अल्पवयीन मुलीची खात्री करुन तिला ताब्यात घेऊन सुखरुप तिच्या कुटूंबियाच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी ही मा.वपोनि श्री अनिल पाटील मा.पो.नि.गुन्हे महादेव कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी पो.उप.नि. अंकूश कर्चे  नो.ना.अमित साळुंखे, पो ना सुरंद्र कोळगे पो.शि बलसूरे पो ना कळसाईत यांनी केली आहे.




**(अनिल पाटील)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोंढवा पो.स्टे.पुणे शहर